मराठी **न्यूज एक्सप्रेस**

मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!

: ९८३४१३८४८२




# भोसरीत महेश लांडगे समर्थकांचा 'महाविजयचा संकल्प'

## प्रचंड शक्तीप्रदर्शन करीत उमेदवारी अर्ज दाखल : सुमारे 40 हजार नागरिकांचा पदयात्रेत सहभाग

**पिंपरी | प्रतिनिधी**

भोसरी विधानसभा मतदार संघातील भाजपा महायुतीचे अधिकृत उमेदवार महेश लांडगे यांनी प्रचंड शक्तीप्रदर्शन करीत उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी समर्थकांनी विजयाची 'हॅट्रिक' करण्याचा निर्धार केला.

सकाळी ग्रामदैवत श्री भैरवनाथ महाराज आणि प्रमुख मंदिरांमध्ये दर्शन घेण्यात आले. त्यानंतर पदयात्रेला सुरवात करण्यात आली. बापुजी बुआ चौक- लांडगे लिंबाजी तालिम मित्र मंडळ- भैरवनाथ मंदिर- मारुती मंदिर- पीएमटी चौक येथे छत्रपती शिवाजी महाराज यांना पुष्पाहार घालून अभिवादन- संत तुकाराम मंगल कार्यालय येथे पदयात्रेचा समारोप करण्यात आला.

भाजपा-शिवसेना- राष्ट्रवादी- आरपीआय- मित्र पक्ष महायुतीच्या माध्यमातून भोसरी विधानसभा मतदार संघातून अधिकृत उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी माजी महापौर नितीन काळजे, माजी महापौर राहुल जाधव, माजी महापौर मंगला कदम यांच्यासह राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष योगेश बहल, शिवसेना नेते इरफान सय्यद, आरपीआयचे शहराध्यक्ष कुणाल वाव्हळकर, बाळासाहेब भागवत उपस्थित होते. पूर्णानगर येथील निवडणूक कचेरीमध्ये उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आला.





### ढोल-ताशांचा गजर अन् 'जय श्रीराम'चा नारा..!

» ढोल-ताशा पथकांचा दणदणाट करीत ४० हजार समर्थकांचा जनसमुदायाची पदयात्रा दिमाखात निघाली. ठिकठिकाणी रांगोळी काढण्यात आली होती. तसेच, प्रमुख चौकांत भव्य पुष्पवृष्टी करण्यात आली. ढोल-ताशांवर पीएमटी चौकात आमदार महेश लांडगे यांनी ठेका धरला. समर्थक-हितचिंतकांचा उत्साह शिगेला पोहोचला होता. विशेष म्हणजे, महायुतीच्या घटकपक्षांसह सर्वपक्षीय कार्यकर्त्यांनी पदयात्रेत सहभाग घेतला. अत्यंत नियोजनबद्ध काढलेल्या पदयात्रेची संत तुकाराम महाराज मंगल कार्यालय येथे सांगता करण्यात आली.

"१० वर्षे विकासाची.. निरंतर विश्वासाची.." या ध्येयाने ही निवडून विकासाच्या मुद्यांवर आम्ही लढवत आहोत. पिंपरी-चिंचवडकरांच्या हितासाठी अविरतपणे काम करीत राहीन, असा शब्द देतो. ग्रामदैवतांसमोर नतमस्तक होवून आणि वडीलधाऱ्यांचे आशिर्वाद घेवून उमेदवारी अर्ज भरण्यासाठी सकाळी निवासस्थानापासून पदयात्रेला सुरूवात झाली. भोसरी पंचक्रोशीतील सर्व सहकारी, मित्र परिवार आणि हितचिंतकांनी तसेच, महायुतीच्या सर्वच पक्षाच्या कार्यकर्त्यांनी प्रचंड प्रतिसाद दिला. वडीलधाऱ्यांचे आशिर्वाद आणि साथ यामुळे विजयी शंखनाद झाला आहे.

- महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

# पिंपरी विधानसभेत माझा विजय निश्चित : आमदार अण्णा बनसोडे

## जोरदार शक्ती प्रदर्शन करत उमेदवारी अर्ज दाखल

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी विधानसभा मतदारसंघाचे राष्ट्रवादी कॉंग्रेस-भाजप-शिवसेना-आरपीआय (आठवले) मित्रपक्षाचे अधिकृत उमेदवार आमदार अण्णा बनसोडे यांनी जोरदार शक्ती प्रदर्शन करीत सोमवारी (दि. २८) रोजी विधानसभेच्या निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात निवडणूक अधिकारी अर्चना यादव यांच्याकडे आपला उमेदवारी अर्ज सादर केला आहे.



यावेळी त्यांच्यासोबत राष्ट्रवादी अजित पवार गटाचे शहराध्यक्ष योगेश बहल, खासदार श्रीरंग बारणे, शिवसेना शिंदे गटाचे उपनेते इरफान सय्यद, भाजपकडून आमदार अमित गोरखे, उमा खापरे उपस्थित होते.

दरम्यान मतदार संघातून निघताना मोठ्या संख्येने कार्यकर्ते आणि मतदार संघातील नागरिक स्वयंस्फूर्तीने आमदार बनसोडे यांच्यासोबत होते. विशेषतः महिला कार्यकर्त्यांची उपस्थिती लक्षणीय होती. यावेळी रस्त्यांच्या दुतर्फा उभे राहून तसेच घरांच्या छतावरून नागरिक हे अण्णा बनसोडे यांच्यावर पुष्पवृष्टी करीत होते. नागरिकांचा हा उत्स्फूर्त उत्साह आणि कार्यकर्त्यांची गर्दी पाहून आमदार बनसोडे यांचे हृदय भरून आले. अर्ज भरल्यानंतर बनसोडे यांनी सहभागी महायुतीच्या सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि पिंपरी विधानसभेतील नागरिकांचे मनापासून आभार व्यक्त केले. तसेच मतदार संघाच्या सर्वांगीण विकासासाठी येत्या २० तारखेला भरभरून मतदान करा, असं आवाहन बनसोडे यांनी यावेळी केलं आहे.

माध्यमांशी संवाद साधताना आमदार बनसोडे म्हणाले, 'महायुतीच्या सर्वच घटक पक्षाकडून मला पाठींबा मिळाला आहे. पिंपरी विधानसभेतील जनता माझ्या कामावर समाधानी आहे. माझ्यासह महायुतीचे सर्वच उमेदवार निवडून येतील याची मला खात्री आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या स्थापनेपासून मी पक्षाचे काम करीत आहे. नव्या उमेदीने पक्षाचे काम चालू ठेवले. या कार्याची दखल घेऊन पक्षाने माझ्यावर पुन्हा विश्वास व्यक्त केला. जुन्या वादांवर आता पडदा पडला आहे. पक्षातील सर्व मित्र, पदाधिकारी आणि कार्यकर्ते माझ्याबरोबर कायम आहेत. त्यामुळे माझा विजय निश्चित आहे.

# चिंचवड विधानसभेत ॲड. संदीप चिंचवडे यांचा अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल

## राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार पक्षाचे माजी नगरसेवक ॲड. संदीप चिंचवडे यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला

**पिंपरी | प्रतिनिधी**

चिंचवड विधानसभा मतदार संघात राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार पक्षाचे माजी नगरसेवक ॲड. संदीप चिंचवडे यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. यावेळी त्यांच्यासोबत उद्योजक अमर गवारे, अजय गायकवाड, पुंडलिक ठाकूर, राजेंद्र बर्गे हे उपस्थित होते.

ॲड. संदीप चिंचवडे हे अजित पवार यांचे खंदे समर्थक आहेत. उच्चशिक्षित, अभ्यासू नगरसेवक अशी त्यांची ओळख आहे. ते चिंचवड विधानसभा मतदार संघातून राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षातून तीव्र इच्छुक होते. दरम्यान हा मतदारसंघ महायुतीत भाजपला गेल्यामुळे ॲड. संदीप चिंचवडे यांनी अपक्ष मैदानात उतरण्याचे ठरवले आहे. चिंचवड विधानसभा मतदार संघात राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार पक्षाचे माजी नगरसेवक ॲड. संदीप चिंचवडे यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला आहे



मी चिंचवड विधानसभा मतदार संघात अपक्ष निवडणूक घडवणार आहे. मतदारसंघातील सोसायट्यांचे प्रश्न, पिण्याच्या पाण्याचे प्रश्न, रस्त्यांचे प्रश्न, वारंवार खंडित होणारा वीजेचे प्रश्न यासह नागरिकांच्या मूलभूत प्रश्न सोडवण्यावर भर देणार आहे. शहरात मोठे मोठे सोलर पार्क उभारणार आणि नागरिकांना ५ रू/युनिट ने वीज मिळवून देणार आहे.

- ॲड. संदीप चिंचवडे.

# बायोमेट्रिकऐवजी विद्यार्थ्यांची हजेरी रजिस्टरवरच

## मोबाईल रेंज आणि नेटवर्कच्या तांत्रिक अडचणींमुळे हजेरीची माहिती ऑनलाइन नोंदविणे अशक्य

**पुणे | प्रतिनिधी**

राज्यातील शाळांमधील विद्यार्थ्यांची हजेरी चालू शैक्षणिक वर्षापासून मोबाईल ॲपवर घेण्याचे आदेश शालेय शिक्षण विभागाने दिले होते. त्यानुसार अनेक शाळांमध्ये काही दिवस शिक्षकांकडून मोबाईल ॲपवर विद्यार्थ्यांची हजेरी घेतली जात होती. मात्र या मोबाईल ॲपमध्ये तांत्रिक अडचणी, मोबाईल कंपन्यांची विस्कळीत सेवा आणि नेटवर्क अशा समस्या निर्माण झाल्या आहेत. परिणामी शाळांमध्ये पूर्वीप्रमाणेच विद्यार्थ्यांची हजेरी रजिस्टरवरच घेण्याची नामुष्की ओढवली आहे.

ग्रामीण आणि दुर्गम भागात मोबाईल नेटवर्कची अडचण आहे. त्यात आधीच एमडीएम ॲपचा वापर केला जात असल्याने स्विफ्ट चॅट या मोबाइल ॲपद्वारे हजेरी घेतली जात नाही.

शिक्षण विभागाच्या आदेशानुसार प्रत्येक शाळेत स्विफ्ट चॅट या मोबाइल ॲपवर विद्यार्थ्यांची हजेरी घेणे बंधनकारक आहे. त्यानुसार पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांची उपस्थिती ऑनलाइन पद्धतीने शिक्षकांनी नोंदणी करावयाची आहे. महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेच्या समग्र शिक्षाअंतर्गत विद्या समीक्षा केंद्राद्वारे पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांची ऑनलाईन हजेरी नोंदवण्याच्या उपक्रमाला एक वर्षापूर्वी सुरुवात झाली. या उपक्रमात जिल्हा परिषद, नगरपालिका, नगर परिषद अशा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांसोबतच अनुदानित शाळांना आॅनलाईन पद्धतीने विद्यार्थ्यांची हजेरी नोंदवण्याबाबत आदेश लागू करण्यात आला.

त्यानुसार शाळांमधील शिक्षकांनी विद्या समीक्षा केंद्राच्या स्विफ्ट चॅट या ॲप्लिकेशनमधील बॉटद्वारे विद्यार्थ्यांची हजेरी ऑनलाईन पद्धतीने नोंदवण्यास सुरुवात केली. या उपक्रमामुळे वर्गात प्रत्यक्षात किती विद्यार्थी उपस्थित असतात, याची माहिती उपलब्ध होण्यास सुरुवात झाली. रत्नागिरी जिल्ह्यातील बहुतांश शाळा दुर्गम भागात आहेत. या ठिकाणी मोबाईलला रेंजही नसते, तर मोबाईल नेटवर्क दुरापास्त आहे. शाळेतील शिक्षकांकडून एखाद्या अधिकाऱ्याला कार्यालयीन माहिती घेणे अवघड होत आहे. त्यामुळे स्विफ्ट चॅट ॲपच्या तांत्रिक अडचणीचा घोळ या वर्षात तरी दूर होणार का, असा प्रश्न शिक्षकांना भेडसावू लागला आहे.

सध्या नेटवर्क प्रॉब्लेम, ॲपमधील तांत्रिक अडचणी आणि डाटा ओपन होण्यास लागत असलेला जास्तीचा वेळ यामुळे शिक्षकांनी ॲपवर हजेरी घेणे बंद केले असल्याचे चित्र जिल्ह्यात पाहावयास मिळत आहे. पूर्वीप्रमाणेच म्हणजेच रजिस्टरवरच विद्यार्थ्यांची हजेरी घेणे सुरू केले आहे. त्यामुळे एकाही शाळेत स्विफ्ट चॅट ॲपद्वारे विद्यार्थ्यांची हजेरी घेतली जात नसल्याचे चित्र आहे. वेळोवेळी या ॲपला तांत्रिक अडचणी निर्माण होत आहेत. शिक्षण विभागाने या ॲपमधील त्रुटी दूर कराव्या, अशी मागणी शिक्षकांमधून होत आहे.



### शाळांमध्ये हजेरी रजिस्टर आणि एमडीएम ॲपवर

» महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेने पहिली ते बारावीच्या विद्यार्थ्यांची उपस्थिती ऑनलाइन नोंदविण्याचे निर्देश दिले होते. जिल्हा परिषद, महापालिका, नगरपालिका, नगर परिषद अशा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा, अनुदानित शाळांनी ऑनलाइन पद्धतीने विद्यार्थ्यांची उपस्थिती नोंदविण्याबाबत स्पष्ट करण्यात आले आहे. त्यानुसार एमडीएम ॲप तसेच रजिस्टरवर विद्यार्थ्यांची हजेरी घेतली जाते.

### स्विफ्ट चॅटवर हजेरी बंधनकारक

» "शाळांमधील शिक्षकांनी स्विफ्ट चॅट या मोबाइल ॲपद्वारे आपल्या वर्गात उपस्थित असणाऱ्या विद्यार्थ्यांची उपस्थिती ऑनलाइन पद्धतीने नोंदविणे आवश्यक आहे, परंतु आधीच एमडीएम ॲपद्वारे ऑनलाइन नोंदणी होत असल्याने पुन्हा हजेरीसाठी दुसरा ॲप वापरल्यास एकाच कामात शिक्षकांचा वेळ जाणार असल्याने स्विफ्ट चॅट या मोबाइल ॲपचा जिल्ह्यातील शिक्षक वापर करीत नाही," अशी माहिती शिक्षक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी दिली.

### ॲपवर माहिती भरण्यातच जातो वेळ

» शिक्षण विभाग दररोज नवनवीन फतवा काढत आहे. नवनवीन ॲपमुळे शिक्षकांना शिकवण्यापेक्षा ॲपवर माहिती भरण्यातच वेळ जात आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेकडे दुर्लक्ष होत असल्याने काही संघटनांनी ॲपवर माहिती भरण्यास विरोध दर्शवला आहे. बहुतांश शाळा दुर्गम व खेडोपाड्यात आहेत, त्या ठिकाणी रेंज नसते. तसेच विविध अडचणीही आहेत.कामे पूर्ण होतील का, याबाबत अनिश्चितताच आहे.

# चंदन चोरट्यांवर उपचार करणारे डॉक्टर गोत्यात

## पोलिसांना पाहताच चंदन चोरट्यांनी पोलिसांवर हल्ला केला.

**पुणे | प्रतिनिधी**

विधी महाविद्यालय रस्त्यावर गस्त घालणाऱ्या पोलिसांवर चंदन चोरट्यांनी हल्ला केल्याची घटना नुकतीच घडली. स्वसंरक्षणार्थ पोलिसांनी केलेल्या गोळीबारात जखमी झालेल्या चोरट्यांवर उपचार करणारे डॉक्टर गोत्यात आले आहेत. चोरट्यांवर उपचार करणाऱ्या डॉक्टरांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात येणार असल्याची माहिती वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी दिली.

विधी महाविद्यालय रस्त्यावर २२ ऑक्टोबर रोजी मध्यरात्री अडीचच्या सुमारास डेक्कन पोलीस ठाण्यातील पोलीस शिपाई महेश तांबे, गणेश सातव गस्त घालत होते. अभिनव महाविद्यालय पथ परिसरातील जानकी व्हिला बंगल्याजवळ चंदन चोरटे थांबले होते. पोलिसांना पाहताच चंदन चोरट्यांनी पोलिसांवर हल्ला केला. पोलीस शिपाई तांबे यांनी प्रत्युत्तरादाखल पिस्तुलातून चोरट्यांच्या पायाच्या दिशेने गोळीबार केला. गोळीबारात शाहरुख कादीरखान पठाण, फारुखखान कादीरखान पठाण (रा. जंजाळ, ता. सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर) जखमी झाले. याप्रकरणी पोलिसांनी आसिफ हरुनखान गोलवाल (वय २४, रा. जंजाळ, जिल्हा परिषद शाळेजवळ, ता. सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर) याला अटक केली. या प्रकरणी त्यांचे साथीदार नदीम खान लतीफ खान, फिरोज खान शरीफ खान, नजीम खान सादुखान यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

गोळीबारात शाहरुख आणि फारुखखान पठाण जखमी झाले. जखमी अवस्थेत पठाण दुचाकीवरुन छत्रपती संभाजीनगरमध्ये पोहोचले. पठाण गोळीबारात जखमी झाले आहेत, याबाबतची प्रथम वैद्यकीय माहिती (मेडिको लिगल केस- एमएलसी) डॉक्टरांनी पोलिसांना दिली नव्हती. डॉक्टरांनी आरोपींना मदत होईल, असे कृत्य केले. याप्रकरणी डॉक्टरांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात येणार असल्याची माहिती वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी दिली. पसार झालेल्या आरोपींचा पोलिसांकडून शोध घेण्यात येत आहे.



# मद्यधुंद चालकाची कार सहायक पोलीस आयुक्तांच्या वाहनाला धडकली

## ही घटना कोरेगाव पार्क येथील महात्मा गांधी चौकात घडली

**पुणे | प्रतिनिधी**

मद्यधुंद कार चालकाची भरधाव कार कर्तव्यावर जात असलेल्या महिला सहायक पोलीस आयुक्तांच्या वाहनाला धडकली. ही घटना सोमवारी दुपारी साडेतीनच्या सुमारास कोरेगाव पार्क येथील महात्मा गांधी चौकात घडली. या कारचालकाकडे वाहन परवानाही नसल्याचे आढळले आहे.

याप्रकरणी पोलीस शिपाई मनोजकुमार तुकाराम सोने यांनी दिलेल्या तक्रारीनूसार प्रफुल्ल भरत वाडे (३२, रा.विश्रांतवाडी) याच्यावर कोरेगाव पार्क पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेत कोणीही जखमी झाले नसून पोलिसांच्या वाहनाचे नुकसान झाले आहे.

सहाय्यक पोलिस आयुक्त (खडकी) अनुजा देशमाने आणि त्यांचे दोन कर्मचारी येरवड्याहून खडकीच्या दिशेने वाहनातून जात होते. तेव्हा बंड गार्डन पूल परिसरात अपघात झाला. पोलिसांनी सांगितले की, कार चालक मद्यधुंद अवस्थेत त्याची कार चालवत होता. त्याने त्याच्या कारला ब्रेक लावला नाही आणि त्याने मागून पोलिसांच्या गाडीला धडक दिली. यानंतर त्याने पोलिसांशीच हुज्जत घातली. तो एका खासगी कंपनीत काम करतो. याप्रकरणाचा तपास सहायक पोलीस फौजदार आव्हाळे करत आहेत. ही घटना सोमवारी दुपारी साडेतीनच्या सुमारास कोरेगाव पार्क येथील महात्मा गांधी चौकात घडली. या कारचालकाकडे वाहन परवानाही नसल्याचे आढळले आहे. पोलिसांच्या वाहनाचे नुकसान झाले आहे.



# महायुतीचे उमेदवार शंकर जगताप यांच्या थेरगाव येथील पदयात्रेस उत्स्फूर्त प्रतिसाद

## थेरगाव येथील गणेश मंदिरात नारळ वाढवून काढली भव्य पदयात्रा : महायुतीची एकजूट

**पिंपरी | प्रतिनिधी**

चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे भाजप-राष्ट्रवादी काँग्रेस-शिवसेना-आरपीआय (आठवले) मित्रपक्षाचे अधिकृत उमेदवार शंकर जगताप यांनी आज (दि. २८) हजारो चिंचवडकरांच्या साक्षीने थेरगाव 'ग' क्षेत्रीय कार्यालयात उमेदवारी अर्ज दाखल केला. निवडणूक निर्णय अधिकारी अनिल पवार यांच्याकडे सादर केला.

याप्रसंगी केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ, गुजरातचे गृहमंत्री प्रदीप सिंह जडेजा, खासदार श्रीरंग बारणे, माजी खासदार अमर साबळे, आमदार अश्विनी जगताप, आमदार उमा खापरे, आमदार अमित गोरखे, माजी महापौर माई ढोरे, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष योगेश बहल, शिवसेना उपनेते इरफान सय्यद, भाजप प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे, सदाशिव खाडे, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख बाळासाहेब वाल्हेकर, शिवसेना शहरप्रमुख नीलेश तरस, आरपीआय शहराध्यक्ष कुणाल वाव्हळकर, बाळासाहेब भागवत, माजी स्थायी समिती अध्यक्ष राजेंद्र राजापुरे हे उपस्थित होते.

दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांच्या स्मृतिस्थळाचे दर्शन घेऊन पदयात्रेचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी महायुतीचे कार्यकर्त्यांमध्ये कमालीचा उत्साह पाहायला मिळत होता. सुवासिनींचे औक्षण, फटाक्यांची आतषबाजी, फुलांची पुष्पवृष्टी, ढोल ताशांच्या गजर आणि 'अबकी बार, शंकरभाऊ आमदार', 'आले रे आले, कमळ आले', 'अमर रहे, अमर रहे, लक्ष्मणभाऊ अमर रहे', अशा घोषणा देत होते.

गावातील भैरवनाथ मंदिरात दर्शन घेतल्यानंतर सृष्टी चौक, सुदर्शननगर, जवळकरनगर, कल्पतरू फेज १, सुदर्शन चौक, स्वराज गार्डनमार्गे पिंपळे सौदागर गावठाण पुढे शंकर मंदिर, रहाटणी चौक छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यात आले. विमल गार्डन, बळीराज गार्डन, कुणाल गार्डन, बापूजी बुवा मंदिर, थेरगाव हॉस्पिटलमार्गे ग प्रभाग कार्यालयापर्यंत ही पदयात्रा काढण्यात आली. या पदयात्रेला सुमारे ३० हजार कार्यकर्ते व नागरिक स्वयंस्फूर्तीने उपस्थित होते. विशेषतः महिला कार्यकर्त्यांची उपस्थिती लक्षणीय होती. यावेळी रस्त्याच्या दुतर्फा उभे राहून तसेच घरांच्या छतावरून नागरिकांनी शंकर जगताप यांच्यावर जोरदार पुष्पवृष्टी केली. नागरिकांचा हा उत्स्फूर्त उत्साह आणि पदयात्रेला उपस्थित कार्यकर्त्यांची गर्दी पाहून ही पदयात्रा म्हणजे शक्तिप्रदर्शन नसून ही महायुतीचे उमेदवार शंकर जगताप यांच्या महाविजयी यात्रेची पूर्वतयारी असल्याची भावना, यावेळी उपस्थित कार्यकर्त्यांनी व्यक्त केली.



दरम्यान, अर्ज भरल्यानंतर शंकर जगताप यांनी पदयात्रेत सहभागी झालेल्या महायुतीच्या सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि चिंचवड विधानसभेतील नागरिकांचे मनापासून आभार व्यक्त केले. तसेच चिंचवड विधानसभेच्या सर्वांगीण विकासासाठी येत्या २० तारखेला अशीच मनापासून साथ आणि आशीर्वाद द्या, असे आवाहन जगताप यांनी यावेळी केले.

### भाजपकडून मोठे शक्तिप्रदर्शन

» शंकर जगताप यांनी मोठे शक्तिप्रदर्शन करत उमेदवारी अर्ज दाखल दाखल केला. यावेळी भाजपसह महायुतीचे शेकडो कार्यकर्ते या पदयात्रेत सहभागी झाले होते. जगतापांचे समर्थकही मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते. सकाळी ९ वाजता दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांच्या स्मृतिस्थळाचे दर्शन घेऊन भव्य महारॅलीचा शुभारंभ झाला. त्यानंतर पिंपळे गुरव बस स्टॉप, भगतसिंग चौक, जवळकरनगर येथून पिंपळे सौदागर येथील स्वराज हॉटेल, रहाटणी येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, तापकीर चौक, काळेवाडी मार्गे थेरगाव येथील 'ग' क्षेत्रीय कार्यालयापर्यंत ही रॅली काढण्यात आली.

### काटे, कस्पटे, जगताप आणि वाकडकर पदयात्रेत सहभागी

» विधानसभा निवडणुकीत इच्छुक असलेले आणि मागील काही दिवसांपासून ज्यांच्या नाराजीची चर्चा सुरू होती ते भाजपचे माजी नगरसेवक शत्रुघ्न काटे, माजी नगरसेवक संदीप कस्पटे, भाजप उपाध्यक्ष राम वाकडकर तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी नगरसेवक राजेंद्र जगताप यांनी या पदयात्रेत सहभागी होत आम्ही शंकर जगताप यांच्यासोबत असून त्यांना मताधिक्याने आमदार करण्यासाठी आम्ही पुढाकार घेऊन काम करणार असल्याचे स्पष्ट करत या नाराजीच्या चर्चेला पूर्णविराम दिला. पदयात्रेदरम्यान थेरगाव येथील शनी मंदिरात असलेल्या गोमातेचे पूजन शंकर जगताप यांनी केले.

# खरेदी प्रक्रियेच्या अटी-शर्ती बदलल्या

## बदललेल्या अटी-शर्थींमुळे या निविदा प्रक्रिया पारदर्शकपणे स्पर्धा होण्यास अडचण

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेच्या शाळांसाठी बाक, टेबल-खुर्ची खरेदी करण्याची निविदा प्रक्रिया राबविण्यात आली आहे. मात्र, या निविदेतील अटी-शर्थींमध्ये बदल केल्याची माहिती उघड झाली आहे. बदललेल्या अटी-शर्थींमुळे या निविदा प्रक्रिया पारदर्शकपणे स्पर्धा होण्यास अडचण येत आहे. निविदा प्रक्रियामधील अटी शर्थी सर्वसमावेशक करण्यात याव्यात, अशी मागणी होत आहे.




महापालिका शाळेतील पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना बसण्यासाठी टेबल खुर्ची, बाक, (बेंच) तसेच, शाळेतील फर्निचर खरेदी करण्यासाठी भांडार विभाग यांच्या वतीने २७ सप्टेंबर ते ९ ऑक्टोबर या कालावधीत निविदा प्रक्रिया राबविण्यात आली. ही निविदा विशिष्ट ठेकेदारांना डोळ्यासमोर ठेवून त्यांच्याकडे उपलब्ध असणारे प्रमाणपत्र, कागदपत्रानुसार काढण्यात आली आहे. यामध्ये सात वर्षाच्या अनुभवपत्राची मागणी केली आहे. शॉपअ‍ॅक्टमध्ये फर्निचरचा उल्लेख असावा, अशा अटी- शर्थी आहेत. निविदा प्रक्रियामधील अटी शर्थी तयार करून रिंग तयार केली आहे, या निविदा प्रक्रियेतील अटी-शर्थी तयार केल्याने काही ठेकेदारांची रिंग तयार झाली आहे, अशी चर्चा पालिका वर्तुळात सुरू आहे.

> “ दिल्ली शाळांच्या धर्तीवर महापालिका शाळांमध्ये बाकांची रचना करणार आहे. दिल्ली दौरा केलेल्या समितीच्या सूचनांनुसार बाकांची मागणी करत आहेत. त्यानुसार निविदा मागवल्या आहेत. सात वर्षाच्या अनुभवपत्राची मागणी केली होती, तयामध्ये बदल करत एक ते सात वर्षाचा अनुभव असावा, असे केले आहे.
>
> - नीलेश बधाने, साहाय्यक आयुक्त, मध्यवर्ती भांडार विभाग.

# सैनिकी शाळांच्या शुल्कात वीस वर्षांनी वाढ

## ‘एनडीए’तील मराठी मुलांचा टक्का वाढविण्यासाठी धोरणात सुधारणा : शाळांना वार्षिक 50 हजार रुपये शुल्क आकारण्यास मंजुरी

**पुणे | प्रतिनिधी**

राज्यातील अनुदानित सैनिकी शाळांतील विद्यार्थ्यांचा राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी अर्थात एनडीएतील टक्का वाढविण्यासाठी शालेय शिक्षण विभागातर्फे सैनिकी शाळांच्या धोरणात सुधारणा करण्यात आली आहे. त्यानुसार, राज्यातील सैनिकी शाळांची सुमारे २० वर्षांनी शुल्कवाढ करण्यात आली असून, आता या शाळांना वार्षिक ५० हजार रुपये शुल्क आकारण्यास मंजुरी देण्यात आली आहे.




शालेय शिक्षण विभागाने याबाबतचा शासन निर्णय नऊ ऑक्टोबरला, आचारसंहिता लागू होण्यापूर्वी प्रसिद्ध केला. राज्यात एकूण ३८ अनुदानित सैनिकी शाळा आहेत. मात्र, या शाळांतून ‘एनडीए’त निवड होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या अत्यल्प असल्याने सैनिकी शाळांसाठी सुधारित धोरण लागू करण्यात आले आहे. त्यासाठी राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेचे संचालक यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त करण्यात आली होती. या समितीने सादर केलेल्या सुधारणांबाबतच्या शिफारशी असलेल्या अहवालाला राज्य मंत्रिमंडळाने ३० सप्टेंबर रोजी मान्यता दिली. त्यानुसार, आता राज्यातील अनुदानित सैनिकी शाळांना सुधारित धोरण लागू करण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

राज्यातील अनुदानित सैनिकी शाळांत इंग्रजी माध्यमातून शिक्षण दिले जाणार आहे. तसेच, केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाचा अभ्यासक्रम एनडीए आणि इतर स्पर्धा परीक्षांशी सुसंगत असल्याने याच अभ्यासक्रमाची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेमार्फत सुधारित अभ्यासक्रम २०२५-२६ या शैक्षणिक वर्षापासून सुरू करण्यात येणार आहे. या शाळांचे शैक्षणिक वर्ष १ एप्रिल ते ३१ मार्च असे असणार आहे. अनुदानित शाळांतील शुल्क २००२-०३ मध्ये १५ हजार रुपये निश्चित करण्यात आले होते. त्यानंतर शुल्कनिश्चिती करण्यात आलेली नाही. त्यामुळे, वाढत्या महागाई निर्देशांकानुसार, सैनिकी शाळांतील विद्यार्थ्यांकडून प्रतिवर्ष कमाल ५० हजार रुपये शुल्क आकारता येणार आहे. शाळांना महाराष्ट्र शैक्षणिक संस्था २०११ मधील तरतुदी लागू राहणार असल्याचे नमूद करण्यात आले.

### एनडीए प्रवेश परीक्षा बंधनकारक

» राज्यातील सर्व सैनिकी शाळांतील बारावीच्या प्रत्येक विद्यार्थ्याला व विद्यार्थिनीला एनडीएची प्रवेश परीक्षा देणे बंधनकारक करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्याबाबतची जबाबदारी समादेशकांची असेल. त्यासाठीची तयारी शाळांनी करून घेणे आवश्यक राहील. या निकषाची पूर्तता न करणाऱ्या शाळांचे रूपांतर सर्वसाधारण अनुदानित शाळेत करण्यासह शाळेला दिले जाणारे अनुदान बंद करून दिलेली जमीन परत घेतली जाणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

### सहशिक्षणाची सुविधा

» शाळेत सहावी ते आठवीसाठी ३५, नववी ते दहावीसाठी ४०, अकरावी ते बारावीसाठी ४५ अशी कमाल पटसंख्या असेल. तसेच २०२१-२२ पासून एनडीएमध्ये मुलींना प्रवेश देण्यास सुरुवात झाली असल्याने मुलांच्या आणि मुलींच्या सैनिकी शाळांमध्ये सहशिक्षणाची सुविधा देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. महत्त्वाचे उपक्रम शाळांमध्ये विविध उपक्रम राबवले जाणार आहेत. त्यात मोफत गणवेश योजना, प्रयोगशाळांचे आधुनिकीकरण, संगणक प्रयोगशाळा, आयसीटी लॅब, खेळांचे साहित्य व क्रीडांगण विकास, ग्रंथालय आधुनिकीकरण, हॅकेथॉन अशा उपक्रमांचा समावेश आहे.

# पदपथांवर उभे राहिले बेकायदा फटाके स्टॉल

## शहरातील विविध भागांमध्ये रस्त्यांवर तसेच पदपथांवर बेकायदा पद्धतीने फटाके विक्रीची दुकाने थाटण्यात आली आहेत.

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील विविध भागांमध्ये रस्त्यांवर तसेच पदपथांवर बेकायदा पद्धतीने फटाके विक्रीची दुकाने थाटण्यात आली आहेत. सिंहगड रस्ता, सहकारनगर, वारजे यांसह अनेक भागांत हे चित्र असून, ही अतिक्रमणे तातडीने दूर करून त्याचा अहवाल सादर करावा, असे आदेश पालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांनी दिले आहेत.




शहरातील नागरिकांच्या सुरक्षिततेचा कोणताही विचार न करता अनेक भागांत दिवाळीसाठी बेकायदा पद्धतीने फटाक्यांचे स्टॉल उभारून विक्री केली जात आहे. दिवाळीच्या काळात फटाका विक्री करण्यासाठी महापालिकेच्या वतीने लिलाव करून स्टॉल उपलब्ध करून दिले जातात. महापालिकेच्या १५ क्षेत्रीय कार्यालयांमध्ये असलेल्या जागांचा लिलाव करून हे स्टॉल दिले जातात. यंदा शनिवार पेठेतील वर्तक उद्यान वगळून अन्य कोणत्याही ठिकाणी फटाक्यांच्या स्टॉलला महापालिकेला फारसा प्रतिसाद मिळालेला नाही. मात्र, दुसरीकडे शहराच्या सर्वच भागांतील रस्त्यांवर सर्रास पत्र्याचे शेड उभारून फाटके विक्रीची दुकाने थाटण्यात आली आहे. पालिकेची कोणतीही परवानगी न घेता हे स्टॉल उभारण्यात आले आहेत.

रस्त्यांवर तसेच फूटपाथवर हे बेकायदा स्टॉल उभारताना सुरक्षिततेच्या नियमांचे पालन केले आहे की नाही, याची माहितीदेखील महापालिकेकडे उपलब्ध नाही. वडगाव शेरी, धानोरी, धायरी, सिंहगड रस्ता, कात्रज-कोंढवा रस्ता, बिबवेवाडी, कोथरूड, या परिसरात हे स्टॉल गेल्या पाच ते सहा दिवसांपासून सुरू झाले आहेत. त्यामुळे रस्त्यावर वाहतूक कोंडी होत आहे. शिवाय नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्नही समोर आला आहे.

सिंहगड रस्त्यावर पादचारी मार्गावर अनेक दुकाने उभारून फाटकेविक्री सुरू असल्याचा प्रकार अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर त्यांनी नागरिकांच्या सुरक्षेस प्राधान्य देऊन कारवाई करण्याचे आदेश अतिक्रमण विभागाला दिले.

> “ रस्त्यावर, पादचारी मार्गावर बेकायदा पद्धतीने फाटके विक्रीची दुकाने उभारणे चुकीचे आहे. यामुळे नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. यावर कारवाई करण्याच्या सूचना अतिक्रमण विभागाला दिल्या आहेत.
>
> - पृथ्वीराज बी. पी., अतिरिक्त आयुक्त, महापालिका.

### कारवाईवर राजकीय दबाव?

» स्थानिक राजकीय नेत्यांना हाताशी धरून ही फटाक्यांची दुकाने सुरू केली जातात, तर काही ठिकाणी अतिक्रमण विभागाच्या कर्मचाऱ्यांच्या आशीर्वादाने दुकाने थाटण्यात आली आहेत, असाही आरोप केला जात आहे.